**महाराष्ट्र शासन**

क्र. अधापु २०१५/ प्र.क्र. ११२/ना.पु.२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २ मार्च, २०१६.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा.

**विषय :-** राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी माहे मार्च, २०१६ करिता मासिक नियतन.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/(प्र.क्र.१००)/नापु-२२, दिनांक २४/०७/२०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक अधापु-२०१५/(प्र.क्र.१००)/नापु-२२, दिनांक ५/०८/२०१५.
३) केंद्र शासनाचे क्र. २/महाराष्ट्र/२०१५- बीपी-III, दि.२९/१/२०१६ चे पत्र.

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याकरिता माहे मार्च,२०१६ करिता केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक २९.१.२०१६ च्या पत्रान्वये अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे.

२. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांपैकी शेतकऱ्यांना प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात यावे. सदर योजनेच्या लाभाकरिता संदभाधीन दि.५.८.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

**३. उपरोक्त लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याकरिता ते केंद्र शासनाकडून आधारभूत किंमत दराने खरेदी करण्यात यावे. केंद्र शासन / भारतीय अन्न महामंडळाकडून ₹ १५२५/- प्रति क्विंटल दराने गहू व ₹ २१६४.१८ प्रति क्विंटल दराने "अ" दर्जाचा तांदूळ खरेदी करण्यात यावा. लाभार्थ्यांना तांदूळ ₹ ३/- प्रतिकिलो व गहू ₹ २/- प्रतिकिलो या दराने धान्य वितरीत करण्यात यावे.**

४. दिनांक २४/७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्य देण्यासाठी याद्वारे माहे मार्च, २०१६ करिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करण्यात येत आहे. माहे मार्च, २०१६ करिता जिल्हानिहाय अन्नधान्याच्या मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक २४/७/२०१५ नुसार विहित केलेल्या परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.

५. सदर पत्रामध्ये नमूद केल्यानुसार माहे मार्च, २०१६ च्या नियतनाच्या उचलीचा व रकमा जमा करण्याचा कालावधी केंद्र शासनाच्या उपरोक्त दि. २९.१.२०१६ च्या पत्रापासून ३० दिवसांचा राहील. उचलीच्या अंतिम दिनांकाची वाट न पाहता, विहित मुदतीत रक्कम जमा करुन नियतनानुसार संपूर्ण अन्नधान्याची उचल करुन निश्चित केलेल्या दराने व परिमाणात अन्नधान्याचे वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

६. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश ई-मेलद्वारे व उपआयुक्त (पुरवठा) यांना फॅक्स व ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे अन्नधान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

७.  **भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

८.  शिधापत्रिकाधारकास रास्तभाव धान्य दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

९.  सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २००१ मधील तरतुदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

१०.  सोबतच्या विवरणपत्रांतील नियतनाच्या तक्त्यांमध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

११.  माहे मार्च,२०१६ या कालावधीसाठी उक्त लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

१२.  मंजुर नियतनानुसार लाभार्थ्यांकरीता गहू व तांदळाची उचल करुन वाटप करावे व केलेल्या उचल व वाटपाची माहिती न चुकता "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास वेळीच भरावी. नियतन, उचल व वाटप यासंबंधीची माहिती वेबसाईटवर प्रदर्शित करण्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून केलेल्या उचलीबाबतची व रास्तभाव दुकानदारांनी केलेल्या उचलीबाबतची माहिती दररोज उपसंचालक, नागरी पुरवठा यांना सादर करावी.

**(हेमंत वाडीकर)**
**कक्ष अधिकारी**

सोबत :- विवरणपत्र.

प्रत:-

१) उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद, अमरावती, नागपूर (फॅक्सद्वारे)

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास भरली जाण्याची योग्य ती दखल घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

**(हेमंत वाडीकर)**
**कक्ष अधिकारी**

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

## विवरणपत्र

### शासन पत्र क्र. अधापु-२०१५/प्र.क्र.११२/नापु-२२, दि. २/०३/२०१६ सोबतचे विवरणपत्र

### राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांपैकी सर्व शेतकऱ्यांना द्यावयाच्या अन्नधान्याच्या नियतनाबाबतचे विवरणपत्र (माहे मार्च, २०१६)

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्य संख्या | प्रत्येक महिन्याकरीता नियतनाचे परिमाण | | दरमाह मासिक नियतन (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| १ | औरंगाबाद | ५६७००७ | ३ | २ | १७०१ | ११३४ | २८३५ |
| २ | जालना | २४९३८१ | ३ | २ | ७४८ | ४९९ | १२४७ |
| ३ | नांदेड | ६८७९९१ | ३ | २ | २०६४ | १३७६ | ३४४० |
| ४ | बीड | ६६६३९९ | ३ | २ | १९९९ | १३३३ | ३३३२ |
| ५ | उस्मानाबाद | ४७३६५८ | ३ | २ | १४२१ | ९४७ | २३६८ |
| ६ | परभणी | ४०७१६३ | ३ | २ | १२२१ | ८१४ | २०३५ |
| ७ | लातूर | ३८२४४० | ३ | २ | ११४७ | ७६५ | १९१२ |
| ८ | हिंगोली | २१३६९१ | ३ | २ | ६४१ | ४२७ | १०६८ |
| ९ | अमरावती | ६०३३३२ | ३ | २ | १८१० | १२०७ | ३०१७ |
| १० | वाशिम | २७३६३२ | ३ | २ | ८२१ | ५४७ | १३६८ |
| ११ | अकोला | २५२९३० | ३ | २ | ७५९ | ५०६ | १२६५ |
| १२ | बुलढाणा | ४३११२१ | ४ | १ | १७२४ | ४३१ | २१५५ |
| १३ | यवतमाळ | ४०५२१५ | ३ | २ | १२१६ | ८१० | २०२६ |
| १४ | वर्धा | २४९९१६ | ३ | २ | ७५० | ५०० | १२५० |
| एकूण | | ५८६३८७६ | | | १८०२२ | ११२९६ | २९३१८ |

**Government of Maharashtra**

No.- Asuka-2015/C.R.112/CS-22,
Food, Civil Supplies & Consumer
Protection Department, Madam Cama
Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralay Annex, Mumbai-400 032
Date :- 2nd March, 2016.

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex, Dattapada Road, Rajendra Nagar,
Boriwali (E), Mumbai – 400 066

**Sub :- Allocation of Foodgrains for APL (Saffron) cardholder farmers not included under NFSA, 2013 for the months of March, 2016.**

**Ref :-** 1) Govt. of India letter No.2/Maharashtra/2015-BP-III, Dt.29.1.2016
2) State Govt. Letter of even no. Dtd. 2.3.2016.

Sir,

Government of India vide its above referred letter dated 29.1.2016 has sanctioned additional allocation at applicable MSP Accordingly State Government has issued districtwise allocation orders for the months of March, 2016, vide above referred letter dated 2nd March, 2016. (copy enclosed). State Government has also instructed its field authorities to purchase foodgrains at MSP i.e. Rs. 1525/- per Quintal for Wheat and Rs. 2164.18 per Quintal for "A" Grade Rice.

You are therefore requested to release the allocated quota to the nominees of District Collector's as per the statement attached under intimation to this Government. This being the very sensitive issue so you are requested to give instructions to your regional offices to allow these district officials to lift the foodgrains as early as possible.

Yours faithfully,

**(Hemant Wadikar)**
**Section Officer**

Copy to: 1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.